


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १९३ वा मंगळवार दि १६ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अन्यथा एकाही मंत्र्याला फिरू देणार नाही; सुप्रिया सुळेंचा नाशिकमधून सरकारला इशारा

**वृत्तसंस्था/ नाशिक**

आज आपण शेतकऱ्यांच्या न्यायासाठी एकत्र आलो आहोत. राज्यातील तमाम शेतकऱ्यांनी प्रत्येक जिल्ह्यातील कलेक्टर कार्यालयात जाऊन कर्जमाफीची मागणी करा. एका महिन्याच्या आत सरसकट कर्जमाफी दिली नाही तर देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमधील एकही मंत्र्याला फिरू देणार नाही,ड्ड्ड असा इशारा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारला दिला आहे. नाशिक शहरात आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने शेतकरी कष्टकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी भव्य आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. सुळे पुढे म्हणाल्या, ज्या लाडक्या बहिणीचे पैसे बंद केले, ते मिळवून देण्यासाठी संघर्ष करू. यूपीए सरकारच्या काळात ७० हजार कोटींची कर्जमाफी दिली होती. नाशिक जिल्हा बँकेतून ६५ हजार शेतकऱ्यांची नावे कमी करून इतरांची नावे घेतली गेली. या प्रकरणाची चौकशी लावण्यासाठी आम्ही सर्व खासदार केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू. हा मोर्चा ही छोटीशी सुरुवात आहे. शेतकऱ्यांना न्याय देणारा पक्ष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस आहे. केंद्रात कृषिमंत्र्यांना आणि पंतप्रधानांना भेटून शेतकरी प्रश्न मांडूअसं आश्वासन सुळे यांनी दिलं आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे आज जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावरून सकाळी साडेदहाला मोर्चा निघाला. या मोर्चात ज्येष्ठ नेते खासदार शरद



पवारांसह पक्षाचे प्रमुख नेते मोर्चात सहभागी झाले होते. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या मोर्चाच्या माध्यमातून एल्गार पुकारण्यात आला. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, कांद्याची मुक्त निर्यात सुरू करावी, कापसाची आयात तातडीने थांबवावी, द्राक्ष उत्पादकांना विशेष पॅकेज तसेच शेतीमालाला हमीभाव द्यावा, दुधाला प्रतिलिटर दहा रुपये अनुदान मिळावे यासह विविध मुद्यांवर हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता.

---

# बिबट्यानंतर साक्षात वाघाचे दर्शन

## बोदवड रोडवरील वन विभागाच्या गार्डन जवळ झाले वाघाचे दर्शन

**जनसंचलन/मलकापूर**

काही दिवसा अगोदर जांभूळ धाबा कडे जाणाऱ्या बोदवड रोड वर नागरिकांना बिबट्याचे दर्शन झाले होते व त्यामुळे बऱ्याच दिवस नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते आता त्याच परिसरामध्ये बोदवड रोडवरील वन विभागाच्या गार्डनजवळ वाघ दिसल्याची घटना समोर आली आहे. रात्रीच्या वेळेस रोडवरून प्रवास करत असताना काही नागरिकांना वाघ रस्ता ओलांडताना दिसला लोकांनी क्षणाचा विलंब न करता मनामध्ये धाडस निर्माण करून आपल्या मोबाईल मधील कॅमेऱ्यामध्ये वाघाचे छायाचित्र कैद केले व सोशल मीडियावर प्रसारित करून नागरिकांना याबद्दल सावधान केले.

शहरी व ग्रामीण भागाच्या हाकेच्या अंतरावर वाघाचे दर्शन घडल्यामुळे संपूर्ण परिसरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे शेतीमध्ये हंगामाच्या दिवसांमध्येच अशा प्रकारची घटना घडल्यामुळे शेतकऱ्यांची झोप उडाली आहे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे, आजूबाजूलाच नागरिकांच्या वस्त्या आहेत सालीपुरा, गाडेगाव, आदर्श नगर, आणि काही गावांमध्ये जसे वाकोडी , वाकोडी ग्रामीण, लासुरा जांभूळ धाबा, अशा अनेक गावातील नागरिक, विद्यार्थी,



शेतकरी , शेतमजूर, रस्त्याने प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये खूप मोठे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे या परिस्थितीवर स्थानिक वन विभाग लवकरात लवकर काय ॲक्शन घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# दागिने खरेदीच्या बहाण्याने १.६२ कोटींची फसवणूक!

**जनसंचलन/ खामगाव**

शहरातील दोन सराफा व्यावसायिकांची तब्बल १ कोटी ६२ लाख ४४ हजार ९३९ रुपयांनी फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रिशी संदीप खत्री (२४, रा. रायगड कॉलनी, खामगाव) याने सराफा व्यावसायिक जितेंद्र मुरलीधर सोनी (५५, रा. मेनरोड, खामगाव) व अभिषेक महेश शेलार यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून सोन्याचे दागिने घेतले. सोनी यांच्या फर्मकडून १ कोटी ३७ लाख ४० हजार ५५७ रुपयांचे, तर शेलार यांच्या फर्मकडून २५ लाख ४ हजार ३८२ रुपयांचे दागिने आरोपीने घेतल्याचे नमूद आहे. मात्र, त्याबदल्यात दिलेले धनादेश वठले नसल्याने दोन्ही व्यापाऱ्यांची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुंबईतील सांस्कृतिक लढा

## संपादकीय लेख

चर्नीरोडला मधल्या पुलावरून खाली उतरले की पूर्वे ला केळेवाडीच्या अरुंद रस्त्यावर सहा मजली इमारत उभी राहिलेली दिसते. या इमारतीला ९० वर्षांचा सांस्कृतिक इतिहास आहे. मुंबई मराठी साहित्य संघाची ही इमारत शताब्दीकडे वाटचाल करत आहे. मुंबईतील साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्राचा ही इमारत मानबिंदू आहे. सध्या ही संस्था चर्चेत आली आहे ती या संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीमुळे. या आधी या संस्थेमध्ये निवडणूक होऊन गेली तरी फार चर्चा होत नव्हती. मात्र यंदा ही निवडणूक गाजत आहे. मुंबई मराठी साहित्य संघाचा जन्म २१ जुलै १९३५ रोजी झाला. न्या. गोविंद रानडे यांनी सन १८७८ मध्ये ग्रंथकारांची सभा पुण्यामध्ये आयोजित केली होती. ही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सुरुवात मानली जाते. मात्र यात सातत्य नव्हते. १८७८ नंतर मग १८८५ मध्ये ही सभा झाली. त्यानंतर १९०५ मध्ये ही सभा झाली. साताऱ्यामध्ये लेखक मंडळी एकत्र जमली आणि हे संमेलन पहिले संमेलन मानले गेले. १९१२ मध्ये अकोल्यातील संमेलनात घटना तयार झाली आणि त्यानुसार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यालय मुंबईत आले. हे कार्यालय सुमारे २० वर्षे मुंबईत होते. मग ते पुण्याला हलवले. यावेळी मुंबईमध्ये साहित्यिक क्षेत्रामध्ये पोकळी निर्माण झाल्याची जाणीव झाली. त्यातूनच मुंबई मराठी साहित्य संघाला चालना मिळाली. १९३४ मध्ये मुंबई मराठी साहित्य संमेलन पार पडले आणि त्यानंतर या संमेलनातून साहित्य संघ जन्माला आला. महानगरीमध्ये मराठी साहित्य आणि संस्कृतीचा जागर व्हावा याच उद्देशाने ही संस्था कार्यान्वित झाली. या संस्थेचे कार्यालय डॉ. अ. ना. भालेराव यांच्या निवासस्थानी होते. साहित्यासोबतच मुंबई मराठी साहित्य संघाने नाट्यक्षेत्रालाही हातभार लावला. नव्या नाटकांच्या निर्मितीचा प्रारंभ, नाट्यगृहाची सोय करण्यासाठी नाट्यमंदिर बांधण्याचा संकल्पही साहित्य संघाने केला. साहित्य संघाने या नाट्यमंदिरासाठी एप्रिल १९४४ मध्ये १५ दिवसांचा शतसांवत्सरिक नाट्य महोत्सवही आयोजित केला. यातून ४६ हजार रुपयांचा निधी जमा झाल्याच्या नोंदी आढळतात. याच वर्षी साहित्य संघाच्या घटनेत फेरफार होऊन संघाच्या उद्देशाची कलमे स्पष्ट करण्यात आली. संस्थेची नोंदणी करण्याचे ठरले. त्यानंतर चर्चा मंडळाच्या बैठकी सुरू झाल्या. संघाच्या सन १९४९ च्या वार्षिक साधारण सभेने दिलेल्या आदेशानुसार जागेची निश्चिती करण्यात आली. १९५० मध्ये साठेखत करण्यात आले मात्र जागा ताब्यात यायला आणखी काही कालावधी गेला. २२ ऑक्टोबर १९५२ ला खरेदीखत झाले. त्यानंतर २७ ऑक्टोबर १९५२ ला भूमिप्रवेश सोहळा झाला. साहित्य संघाच्या या स्वतःच्या जागेसाठी साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रातील अनेकांनी मेहनत घेतली. केवळ जमीन मिळाली म्हणजे वास्तू उभी राहत नाही. ही वास्तू उभी राहावी यासाठीही अनेकांनी प्रयत्न केले. या वास्तूमध्ये खुर्च्या आणण्यापासून अनेकांनी निःस्वार्थी मनोवृत्तीने मेहनत केली. डॉ. भालेराव यांनी संस्थेवरील जागा खरेदीचे कर्ज फेडण्यासाठी स्वतःचे घरही विकण्याची तयारी दर्शवली होती. त्यांच्या निधनानंतर सन १९५६ मध्ये सामान्य माणसाला साहित्य संघासाठी हातभार लावता यावा यासाठी देणगीची तिकीटे काढण्यात आली. या काळात तहहयात सभासदांची संख्याही वाढली होती. नाट्योत्सव, नाट्यशाखेची नाटके, देणग्या यातून मोठी रक्कम जमा होऊन कर्ज फिटले. हे पाहायला डॉ. भालेराव हयात नव्हते, मात्र यामुळे सामान्य मुंबईकर मराठी माणसाची साहित्य संघाशी नाळ जुळली गेली. साहित्य संघाची वास्तू उभी राहिल्यानंतर या वास्तूने अनेक ऐतिहासिक क्षण अनुभवले. गो. ब. देवल यांच्या जन्मशताब्दीपासून या संस्थेमध्ये अनेक कार्यक्रम झाले. सरकारने १९५५ मध्ये हौशी नाट्य संस्थांच्या नाटकांच्या स्पर्धा सुरू केल्या त्याही याच संस्थेमध्ये सादर करण्यात आल्या. सन १९५८ पासून डॉ. अ. ना. भालेराव व्याख्यानमाला संस्थएमध्ये सुरू करण्यात आली. १९५८ मध्ये संघाने बालनाट्य शाखा सुरू केली. रत्नाकर मतकरींच्या गाजलेल्या मधुमंजिरी आणि चेटकीण या नाटकाचा पहिला प्रयोग साहित्य संघ मंदिरात झाला होता. मग जादूचा वेल या नाटकाचाही प्रयोग झाला. मुंबईमध्ये बालनाट्य चळवळ विस्तारण्यामध्ये साहित्य संघाचा महत्त्वाचा वाटा आहे. महाराष्ट्राच्या मराठी भाषक राज्याच्या मागणीची सुरुवात मराठी साहित्य संमेलनातून झाली. साहित्य संघाच्या माध्यमातून आयोजित केल्या जाणाऱ्या मुंबई उपनगर मराठी साहित्य संमेलनाच्या १९४५ मध्ये भरलेल्या नवव्या अधिवेशनापासून ही मागणी होत होती, अशा नोंदी आढळतात. यावरून साहित्य संघाचा इतिहास लक्षात येतो. प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर, दाजीसाहेब तुळजापूरकर, श्री. म. वर्दे, रामराव विजयकर, भास्करराव जाधव, भा. सी. सुकथनकर, र. धो. कर्वे, खं. सा .दौंडकर असे मुंबईच्या विविध समाजातील थोर कार्यकर्ते संघाच्या बाल्यावस्थेत संघाला लाभल्याने त्यांच्या विविध गुणांचा संस्थेला फायदा झाल्याचे साहित्य संघाच्या संकेतस्थळावरच स्पष्ट नमूद आहे. त्यामुळे या संस्थेबद्दल अल्पकाळात सार्वत्रिक आपुलकी निर्माण झाली, प्रतिष्ठा वाढली होती. मात्र आता शतकी वाटचाल करत असताना अचानकपणे या संस्थेपासून त्यांचे सभासद लांब गेले आहेत का, युवावर्ग येथे वळत नाही का असा प्रश्न पडावा अशी स्थिती निर्माण झाली आहे. पटावर नेमलेले नियमित कार्यक्रम साजरे करायचे म्हणून केले जातात, असेही या संस्थेची सभासद मंडळी सांगतात. यामध्ये प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांचा समावेश आहे. ज्या संस्थेसाठी एकेकाळी सामान्य माणसाने सढळ हस्ते मदत केली तिथे आज लोक फिरकत नाहीत याचे कारण नेमके काय आहे? लोकांच्या हातात मनोरंजनाचे साधन आले हा मुद्दा असला तरी संस्थेशी बांधून ठेवण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करणेही गरजेचे आहे. आज हेच प्रयत्न होत नसल्याने त्याचा गैरफायदा एखाद्या राजकीय पक्षाकडून घेतला जाण्याची शक्यता आहे.

# बाल न्याय अधिनियमांतर्गत निवारा संस्थेसाठी इमारत भाडेतत्वावर देण्याबाबत आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारित अधिनियम २०२१ नुसार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बुलढाणा यांच्या अधिनस्त अधीक्षक, शासकीय निरीक्षणगृह, बालगृह (मुलींचे कनिष्ठ, वरिष्ठ), बुलढाणा या संस्थेसाठी ६ ते १८ वयोगटातील अनाथ, निराधार, निराश्रीत व विधीसंघर्षित प्रवेशितांच्या निवासासाठी व कार्यालयीन कामकाजासाठी सर्व सोयी-सुविधांनी युक्त किमान ४ हजार चौ.फुट बांधकाम क्षेत्र असलेली इमारत भाडेतत्वावर घ्यायची आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व महाराष्ट्र राज्य नियम २०१८ मधील निकषानुसार इमारत उपलब्ध असलेला व नमूद संस्थेसाठी शासकीय




दराने इमारत भाडेतत्वावर देण्यास इच्छुक असलेल्या इमारत मालकांनी इमारत मालकीच्या कागदपत्रांसह वृत्तपत्रात निवेदन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ८ दिवसात अधीक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ, वरिष्ठ बालगृह, बुलढाणा व्दारा- जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय, बस स्टँडच्या मागे, जोशी नेत्रालय जवळ, मुट्ठे ले-आऊट, बुलढाणा ४४३००१ येथे संपर्क साधून संमतीपत्र सादर करण्याचे आवाहन शासकीय निरीक्षणगृहाचे अधीक्षक सुनील वाठोरे यांनी केले आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कान भरले की स्पष्टीकरण मागायचे

## नाराज नेत्याचा भाजपला रामराम, फक्त दोन ओळींचा राजीनामा पाठवला...

**पनवेल :** महापालिका निवडणुकांचे पडघम वाजू लागताच पनवेलच्या एकांगी राजकारणाला ब्रेक लागला आहे. पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती आणि २०१९ साली आमदार प्रशांत ठाकूर यांना विधानसभा निवडणुकीत शह देणारे माजी नगरसेवक हरेश केणी यांनी भाजपमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. हरेश केणी यांच्यासह तीन नगरसेवक आणि काही पदाधिकारी पक्षातून बाहेर पडतील अशी शक्यता आहे. पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी विरोधी पक्षनेते पद सोडण्यास नकार दिल्यामुळे नाराज



झालेल्या हरेश केणी यांनी शेकाप नेत्यांना मोठा धक्का दिला होता. पाच वर्षांपूर्वी नगरसेवक हरेश केणी यांनी समर्थक नगरसेवक शितल केणी, जयश्री म्हात्रे, पापा पटेल आणि बबन मुकादम या नगरसेवकांसह भाजपवासी झाले.२०१९ साली विधानसभा निवडणूक लढवताना शेकापच्या नेत्यांनी दिलेला शब्द पाळला नाही म्हणून केणी यांनी शेकापला सोडचिठ्ठी दिली होती. परंतु पनवेल महापालिकेत पालिकेचे सभागृह नेते आमदारबंधू परेश ठाकूर यांच्याशी केणी यांचे फारसे पटले नाही. २०२४ साली झालेल्या निवडणूकीत केणी यांची राजकीय ताकद असलेल्या प्रभाग क्रमांक १ आणि २ मधील भाजपाला स्पष्ट नाकारले. तुलनेने अनेक पटीने मते आमदार ठाकूर यांच्या विरोधात गेली. या सगळ्यांचा विचार करून केणी यांनी अखेर भाजप सोडण्याचा निर्णय घेतला. केणी यांनी समर्थक नगरसेवकांसोबत पक्ष सोडण्याची तयारी केल्यामुळे भाजपने त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला. नेत्यांचे कान कोणी भरले की नेते स्पष्टीकरण मागायचे. नेत्यांपुढे उभे राहून आपली बाजू मांडायची या प्रकाराला कंटाळलेल्या हरेश केणी यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना राजीनाम्याविषयी माहिती दिलेली नाही. पनवेल तालुका उत्तर मंडल अध्यक्ष या नामधारी अध्यक्षाकडे त्यांनी सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. वैचारिक मतभेद आणि वैयक्तिक कारण पुढे केलेला दोन ओळींचा राजीनामा जिल्हाध्यक्षांना माहितीस्तव त्यांनी सादर केला आहे.


## वोट चोरीची चौकशी आमच्यापासून सुरु करा, सुप्रिया सुळेंचा भाजपवर हल्लाबोल; भारत-पाक मॅच बद्दलही भाष्य...

**नाशिक :** नाशिकमध्ये राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर सुरू असून ज्येष्ठ नेते शरद पवारांसह अनेक नेते आमदार खासदार पदाधिकारी उपस्थित आहे. या शिबिरात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना खासदार सुप्रिया सुळे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. त्यांनी विविध मुद्द्यांवर सरकारला धारेवर धरत, देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवरही भाष्य केले. यावेळी सुळे म्हणाल्या, पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतरही भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना होतो, हे खूपच दुर्वैवी आहे. पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबांचे अश्रू अजूनही थांबलेले नाहीत.मी या सामन्याचा निषेध करते मी हा सामना पाहणार नाही आणि प्रत्येकाने ठरवावं, असं म्हणत सुळे यांनी सरकारवर हल्लाबोल केला. राहुल गांधींच्या मोहब्बत की दुकान या संकल्पनेचे सुळे यांनी कौतुक केलं. त्या म्हणाल्या, राहुल गांधी जे बोलतायत, ते लोकांना पटायला लागलं आहे. आधी त्यांच्या व्हिडिओंना हजारो लाईक्स मिळायचे, आता मात्र करोडोंनी लाईक्स येत आहेत. हे दर्शवते की देशात बदल होत आहे. दिल्लीतही ते जाणवते. इंडिया आघाडीचे काम उत्तम सुरू आहे आणि देशात नक्कीच सत्तापरिवर्तन होईल.राज्यात सध्या पातळी सोडू टीका टिप्पणी सुरू आहे. मात्र कोणी कितीही पातळी सोडली तर आपण पातळी सोडू नका. कुणाच्या वैयक्तिक किंवा कुटुंबार टीका करू नका असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी राष्ट्रवादीच्या प्रवक्त्यांना सूचना केल्या. ऑपरेशन सिंदुरवेळी मी भाजपच्या लोकांना विचारलं पाकिस्तानसोबत चर्चा होणार की नाही. ते म्हणाले चर्चा होणार नाही उत्तर देणे का सही समय है, मी कालच देवा भाऊंना सांगितलं शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी यही सही समय है.अजित पवार गटावर अप्रत्यक्षपणे निशाणा



साधत सुप्रिया सुळे म्हणाल्या, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये टॅलेंटची कमतरता नाही. कुणीही पक्ष सोडून गेलं तरी त्यामुळे काहीही फरक पडणार नाही. नवे टॅलेंट नक्कीच पुढे येईल आणि ते पक्षाला आणखी मजबूत बनवतील. त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले की, ज्यांनी पक्ष सोडला त्यांची चौकशी अजूनही सुरूच आहे. त्यामुळे तुम्ही रुसवे-फुगवे दूर करा आणि लढण्याची तयारी ठेवा. राज्यातील अस्थिरतेवर बोलताना सुळे यांनी सरकारवर टीका केली. महाराष्ट्रात काय चालले आहे हे समजत नाही. राज्यातील अस्थिरता दूर करण्यासाठी कितीही किंमत मोजावी लागली तरी चालेल. तुम्ही टेस्ला द्या, पण आमची मुले फक्त एसटीची मागणी करत आहेत. सरकारने गरिबांच्या गरजांकडे लक्ष द्यायला पाहिजे, असे त्या म्हणाल्या.आपल्या विजयाचे श्रेय मतदारांना देताना त्या म्हणाल्या, मी मतदारांच्या जीवावर निवडून आले आहे. कुठलाही नेता आमच्यासोबत नसतानाही आम्ही निवडून आलो. मतदार आणि कार्यकर्ता आमच्यासोबत होता, म्हणूनच हे शक्य झाले. बारामती माझ्यामागे उभी राहिली, त्यामुळेच मी जगात जाऊ शकले. सुळे यांनी भाजपवर मतदान चोरीचाही आरोप केला. शिरूर आणि बारामतीतून मतदान चोरीची चौकशी आमच्यापासून सुरू करा, असे आव्हान त्यांनी दिले.

## नाटक-सिनेमातून निवृत्त व्हायचंय; नाना पाटेकर यांचे संकेत, येत्या एक जानेवारीपासून मी...



मुंबई : आजवर खूप काम केलं. आता मनासारखं जगावंस वाटतंय. एक जानेवारीला मी वयाची पंचाहत्तरी पूर्ण करीन. त्यानंतर नाटक, सिनेमातून निवृत्त होऊन गावखेड्यांतील विवंचना समजून घ्याव्यात, त्यांच्यासाठी काही करावं, असं वाटतं. नाम फाउंडेशनची धुराही आता मकरंदनेच पुढे न्यावी...फ अशी भावना ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी रविवारी व्यक्त केली आणि गणेश कला क्रीडा मंचाचे प्रेक्षागृहही काही क्षण स्तब्ध झाले; पण ङ्ककान धरायला आणि पाठीवर थाप द्यायला मी सोबत असेनच,फ अशी ग्वाहीही नानांनी दिली.नाम फाउंडेशनच्या दशकपूर्ती सोहळा रविवारी गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडला. या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या भाषणांनंतर नानांनी उपस्थितांशी अनौपचारिक संवाद साधला. पुढच्या पिढीने काम सांभाळण्याविषयी बोलतानाच अचानक नाना पाटेकर यांनी निवृत्तीचा सूर लावल्याने कार्यक्रमाला वेगळीच किनार लाभली. पंचाहत्तरीनंतर नाटक, सिनेमातून निवृत्त व्हावे, असे वाटते. म्हणजे ज्यातून तुम्हाला खूप काही सांगता येईल, अशी एखादी छान कलाकृती वाट्याला आली, तर ती करीनही; पण आता मला माझ्या पद्धतीने जगू द्या,फ अशी भावना नानांनी व्यक्त केली.नामचची पुढची पिढी उत्तम पद्धतीने आमचे काम पुढे नेत आहे. कामाची व्याप्ती खूप वाढली आहे. आता त्यांनी हे काम पुढे न्यावे. ङ्कनामचे पुढील काम मकरंद (अनासपुरे) ठरवेल. मी असेन, तरच काम करीन, ही त्याची भूमिका चुकीची आहे. ङ्कनामसारख्या शंभर संस्था निर्माण झाल्या, तरी समस्या सुटणार नाही,फ असे नाना म्हणाले.याच वर्षी रिलीज झालेल्या हाऊसफुल ५ या चित्रपटात नाना पाटेकर यांचे नुकतेच रुपेरी पडद्यावर दर्शन घडले होते. तर याआधी वनवास, व्हॅक्सिन वॉर या नजीकच्या काळातील सिनेमात ते झळकले होते. मराठीत ओले आले हा गेल्या वर्षी प्रदर्शित झालेला त्यांचा चित्रपट गाजला होता. तर नटसम्राट, आपला माणूस या मराठी सिनेमांमध्ये ते अभिनयासोबत निर्मात्याच्या भूमिकेतही होते.

# मंत्रालयासमोर जंजिरा बंगल्यात खल, एकनाथ शिंदे दाखल, शिवसेनेच्या मंत्र्यांमध्ये काहीतरी मोठं ठरतंय?

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सध्या मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. या घडामोडींचं मुख्य केंद्र आज मंत्री दादा भुसे यांचा मुंबईतील मंत्रालयाच्यासमोर असणारा जंजिरा बंगला आहे. या बंगल्यात आज मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मंत्र्यांची दादा भुसे यांच्या निवासस्थानी अतिशय महत्त्वाची आणि हायव्होल्टेज अशी बैठक पार पडत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीत एकनाथ शिंदे आपल्या मंत्र्यांना मार्गदर्शन करत असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे केवळ मंत्रीच नाहीत तर राज्यभरातील शिवसेनेचे आमदार आणि खासदार यांच्यासाठी ही बैठक बोलावण्यात आल्याची माहिती आहे. या बैठकीनंतर सर्व आमदार, खासदार आणि मंत्र्यांसाठी




स्नेहभोजनाची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे डिनर डिप्लोमसी बघायला मिळत आहे. या बैठकीत शिवसेनेची रणनीती ठरत असल्याची माहिती मिळत आहे. या रणनीतीकडे राजकीय विश्लेषकांचं लक्ष लागलं आहे.महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पडद्यामागे अनेक घडामोडी घडत आहेत. प्रत्येक पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करत आहेत. विरोधक सत्ताधारी महायुती सरकारला घेरण्याची एकही संधी सोडताना दिसत नाहीय. तसेच आगामी निवडणुकांमध्ये स्वतंत्र लढावं की एकत्र लढावं याबाबत महाविकास आघाडीच्या घटक पक्षांचं मंथन सुरु आहे. तर दुसरीकडे सत्ताधारी पक्षांमध्ये देखील सुप्त स्पर्धा बघायला मिळत आहे.

एकनाथ शिंदे यांचं महायुतीत खच्चीकरण केलं जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या पक्षातही सध्या घडामोडी घडत आहेत. शिंदेंच्या नेतृत्वातील आजच्या बैठकीत काय ठरतं? ते पाहणं महत्त्वाचं आहे.दरम्यान, विरोधी पक्षातही जोरदार हालचाली सुरु आहेत. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पक्षाचं आज शिबिर पार पडलं. या शिबिरमध्ये मतचोरीच्या मुद्द्यावरुन चर्चा झाल्याचीदेखील माहिती आहे. तर दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटातही बैठकांवर बैठका पार पडत आहेत. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात नुकतीच जिल्हाप्रमुखांची बैठक पार पडली. या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी काही महत्त्वाच्या सूचना आपल्या जिल्हाप्रमुखांना दिल्या आहेत. त्यानंतर आता शिंदेंच्या शिवसेनेत हालचाली वाढल्या आहेत.


## भारताचा नाद करायचा नाय... भारताने सामना संपवल्यावरही पाकिस्तानचा माज कसा उतरवला

**दुबई :** भारताने सामना संपल्यावरही पाकिस्तानचा माज उतरवला आणि भारताचा नाद करायचा नाही, हे दाखवून दिले. सामना सुरु होण्यापूर्वी सूर्यकुमार यादवने पाकिस्तानच्या कर्णधारासमोर निषेध केला होता. पण सामना संपल्यावर भारतीय संघाने नेमकं केलं तरी काय, हे आता समोर आलं आहे.भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने आशिया कप टी-२० क्रिकेट स्पर्धेतील पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यापूर्वी प्रतिस्पर्धा संघाचा कर्णधार सलमान आगा याच्यासह हस्तांदोलन टाळले. एवढेच नव्हे तर दोघांनी एकमेकांकडेही बघण्यास नकार दिला. प्रतिस्पर्धी कर्णधार नाणेफेकीसाठी उभे राहिले, त्यावेळी सूर्या समालोचक रवी शास्त्री यांच्या नजिक होता. नाणेफेकीच्यावेळी नाणे सूर्याने ऊडवले. नाणेफेक पाकचा कर्णधार सलमानने जिंकली. तो समालोचक रवी शास्त्री यांच्याकडे येत असताना सूर्याने त्याच्याकडे बघणे टाळले तसेच सलमानसह हस्तांदोलनाची तयारीही न दाखवता तो बाजूला निघून गेला.भारतीय खेळाडूंनी सामना संपल्यावर कोणत्याही प्रकारे पाकिस्तान खेळाडूंशी नजरानजर




टाळली. एवढेच नव्हे तर सामना संपल्यानंतर प्रतिस्पर्धी संघांकडून एकमेकांचे चांगल्या खेळाबदलचे कौतुकही टाळले. सूर्यकुमार आणि शिवम दुबे सामना संपल्यानंतर थेट ड्रेसिंग रुममध्ये परतले. भारतीय संघाच्या ड्रेसिंग रुमच्या बाहेर पाकिस्तानचे खेळाडू आले होते. पण भारताचे खेळाडू त्यांच्यासाठी बाहेरच आले नाही. पाकिस्तानच्या खेळाडूंनी भारतीय खेळाडूंना मैदानाबाहेर बोलावण्याचा प्रयत्न केला. पण एकही भारतीय खेळाडू याला बळी पडला नाही.पहिल्याच वेध चेंडूवर विकेट घेत भारताने मिळवलेली पकड पाकचा डाव संपेपर्यंत कायम राखली. पहिल्या दोन षटकात बुमराह-हार्दिक जोडीने दोन विकेट घेतल्या. साहिबझादा फरहानची आक्रमकता त्याच्या सहकाऱ्यांना साधली नाही. मोहम्मद हॅरीस, फखर झमन आणि हसन नवाझ यांना अतीआक्रमकता भोवली. आघाडीला साहिबझादा इमरान आणि तळाला आफरीदी सोडल्यास पाकच्या एकाही फलंदाजास वीस धावाही करता आल्या नाहीत. खर तर १२.५ षटकांत ६ बाद ६४ या परिस्थितीतून पाकने पूर्ण २० षटके फलंदाजी केली.कुलदीपची षटके संपल्यामुळे पाकच्या तळाच्या फलंदाजांचा आत्मविश्वास उंचावला आणि त्यांनी प्रतिकार केला. बुमराह तसेच फिरकी गोलंदाजांच्या अचुकतेमुळे पाकला ६३ चेंडूवर म्हणजेत १०.,३ षटकांत एकही धावही घेता आली नाही. बुमराह, कुलदीप आणि अक्षरने टाकलेल्या प्रत्येकी २४पैकी १५ चेंडू निर्धाव होते, त्यामुळे प्रत्येकी सात षटकार आणि सात चौकार मारल्यावरही पाकची धावसंख्या मर्यादीत राहीली.

## पाकला पराभव जिव्हारी लागला; कर्णधाराने मॅच संपताच तोंड लपवलं; शेवटी कोचलाच...



**दुबई:** आशिया कप २०२५ मधील हायव्होल्टेज सामन्यात आमने सामने आले. भारताच्या पराभवानंतर संपूर्ण पाकिस्तानमध्ये शोककळा पसरली आहे. दुबई क्रिकेट स्टेडियमपासून या शोककळेला सुरुवात झाली. जेव्हा सामना संपल्यानंतर टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादव शिवम दुबेसोबत ड्रेसिंग रूमकडे निघाला. भारतीय संघाच्या कर्णधाराने पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यासाठी अजिबात वाट पाहिली नाही. या घटनेनंतर पाकिस्तानी खेळाडूंमध्ये खळबळ उडाली आहे. यानंतर पाकिस्तानला हा पराभव किती जिव्हारी लागला हे पत्रकार परिषदेत दिसून आले.यानंतर, जेव्हा पत्रकार परिषदेची वेळ आली तेव्हा पाकिस्तानचा कर्णधार आला नाही. हा पाकिस्तानसोबत हस्तांदोलन न केल्याचा निषेध मानला जाऊ शकतो किंवा परभवामुळे वाटलेली लाज असू शकते. परंतु संघाचे मुख्य प्रशिक्षक माइक हेसन यांनी याबद्दल स्पष्टीकरण दिले. कारण माइक हेसन सामन्यानंतरच्या मुलाखतीत पाकिस्तानच्या वतीने बोलण्यासाठी आले होते.क्रिकेट सामन्यात सामना संपल्यानंतर, सामन्यानंतरची मुलाखत आणि पत्रकार परिषद असते. दोन्ही संघांचे कर्णधार सामन्यानंतर जातात. पराभूत आणि जिंकणारे कर्णधार त्यांचे विचार मांडतात. मैदानावर सर्व काही संपल्यानंतर, माध्यमांसाठी पत्रकार परिषद असते. सहसा यामध्ये फक्त कर्णधारच येतो. कधीकधी सामन्यात चांगली कामगिरी करणारे खेळाडू देखील येतात, परंतु आशिया कपमध्ये भारताकडून झालेल्या पराभवानंतर पाकिस्तानी कर्णधार ना सामन्यानंतरच्या मुलाखतीसाठी आला आणि ना पत्रकार परिषदेत उपस्थित राहिला.अशा परिस्थितीत संघाचे प्रशिक्षक माइक हेसन यांना पत्रकार परिषदेत यावे लागले. माइक हेसन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ठसाहजिकच, आम्ही खेळाच्या शेवटी हस्तांदोलन करण्यास तयार होतो. भारतीय संघाने तसे केले नाही याचे आम्हाला दुःख झाले. आम्ही हस्तांदोलन करण्यासाठी तिथे गेलो होतो, पण ते आधीच चेंजिंग रूममध्ये गेले होते. सामना संपवण्याचा हा एक निराशाजनक मार्ग होता. ज्या सामन्यात आम्ही खेळण्याच्या पद्धतीमुळे निराश झालो होतो, पण अर्थातच आम्ही हस्तांदोलन करण्यास तयार होतो.

# मराठा आणि ओबीसी नेते वास्तविकता समोर आणणार नाहीत, पण सरकार...; देवेंद्र फडणवीस स्पष्टच बोलले

**पुणे** : मराठा समाजाला आरक्षण दिल्याच्या मुद्द्यावर दोन्ही बाजुंनी केवळ राजकारण सुरू आहे. सरकारी निर्णय हा ओबीसी समाजाच्या हक्कांवर गदा आणणारा नाही.

एकाही अपात्र व्यक्तीचा ओबीसीत समावेश होणार नाही, अशा प्रकारची काळजी निर्णयात घेण्यात आली आहे. याबाबत विजय वडेट्टीवारांसारख्या व्यक्तींना बोलण्याचा काहीही अधिकार नाही. उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात ओबीसींचे गेलेले राजकीय आरक्षण आम्हीच परत आणले. ओबीसींसाठीचे चांगले निर्णय आमच्या सरकारनेच घेतले आहेत, अशा स्पष्ट शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजासाठी काढलेल्या आरक्षणाच्या निर्णयावर टीका करणाऱ्या विरोधकांना सुनावले. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात फडणवीस यांनी पत्रकारांशी




संवाद साधून विविध मुद्यांवर भाष्य केले. फडणवीस म्हणाले, आमच्या सरकारनेच २०१४ ते २०२५ या काळात ओबीसींसाठी सर्वाधिक निर्णय घेतले. ओबीसी समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय तयार केले, विविध योजना लागू केल्या, महाज्योती संस्थेची निर्मिती केली, ४२ वसतिगृहे बांधले. सर्वांत महत्वाचे म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या सरकारने ओबीसींचे घालवलेले राजकीय आरक्षण पुन्हा आमच्याच सरकारने आणले आहे. त्यामुळे ओबीसी जनतेला त्यांचे हित पाहणाऱ्या व्यक्ती समजतात. यापूर्वी कोणत्याही सरकारने ओबीसींच्या हितांसाठी आमच्या सरकारएवढे काम केले नाही. याबाबत आपण खुली चर्चा करण्यासाठी तयार आहोत. विरोधी पक्षातील लोकांना केवळ राजकारण करायचे आहे. मात्र, आम्हाला ओबीसी आणि मराठा समाजासोबतच सर्वच समाजांच्या हितांची काळजी आहे. सर्व समाजाच्या हिताची काळजी आमचेच सरकार करू शकते.मराठा आणि ओबीसी या दोन्ही समाजांचे नेते खरी वास्तविकता समोर आणणार नाहीत, तोपर्यंत तेढ कमी होणार नाही. कुणबी नोंदी असणाऱ्यांना प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे ओबीसी समाजातील जनतेने काळजी करण्याची गरज नाही. ओबीसी समाजाचे आरक्षण गेल्याचे वातावरण तयार करण्याचे काम काही मंडळींकडून होत आहे. याचा परिणाम मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होतो आणि दुसरीकडे टोकाचेच राजकारण चालले आहे. लोकांपर्यंत वास्तविकता पोहोचवली, तर सामाजिक तेढ कमी होईल. आमचे सरकार ही वास्तविकता लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.राज्यातील विद्यापीठांमध्ये प्राध्याकांची संख्या कमी आहे. ही कमकरता दूर करण्यासाठी रिक्त पदांच्या ८० टक्के पदांवर प्राध्यापक नेमण्याची प्रक्रिया सुरू केली. ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी राज्यपालांनी सूचना केल्या होत्या.

त्यानुसार हे बदल पूर्ण झाले आहेत. त्यामुळे लवकरच रिक्त पदांच्या ८० टक्के पद भरली जातील आणि उरलेल्या २० टक्के पदांनाही सरकारकडून लवकरच मान्यता मिळणार आहे. किंगच्या प्रक्रियेमध्ये शिक्षकेतर पदांचा विचार केला जात नाही. त्यातील एक मुद्दा शिक्षक-विद्यार्थ्यांच्या प्रमाणाशी निगडित आहे. हे गंभीर आहे. त्याची सुधारणा करण्यात येईल, असे स्पष्टीकरण फडणवीस यांनी सरकारी विद्यापीठांची एनआयआरएफ किंग घसरण्यावर दिले.

# तरच शेतकरी आत्महत्या थांबतील; केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे मोठे विधान..

**पुणे** : भारतात महाराष्ट्रात आणि शेतीसाठीचे पाणी हीच मुख्य समस्या आहे. मुबलक पाणी मिळाल्यास शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येणार नाही. देशात कुठेही पाण्याची कमतरता नाही. पाण्याच्या योग्य नियोजनाअभावीच ही समस्या वाढली आहे, असे मत केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी व्यक्त केले. राज्यातील सिंचनाचे प्रमाण ६५ टक्क्यांवर गेल्यास, शेतीला दूधदुभत्याची जोड मिळाल्यास शेतकरी आत्महत्या नक्की थांबतील, असा विश्वासही गडकरी यांनी व्यक्त केला. गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित नाम फाउंडेशनच्या दशकपूर्ती सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून गडकरी बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग व मराठी भाषामंत्री उदय सामंत, ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, फाउंडेशनचे संस्थापक ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर व सचिव प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे आदी उपस्थित होते.वाढत्या शेतकरी आत्महत्यांमुळे समाजातील संवेदनशील व्यक्ती अस्वस्थ झाल्या. त्यातूनच नाम फाउंडेशन सारख्या संस्था सुरू झाल्या. त्यांनी प्रचंड काम केले. समस्यांची व त्यावरील उपायांची जाण असलेल्या, संवेदनशील व्यक्तींची समाजाला गरज आहे. त्यासाठी पैसा द्यायलाही लोक पुढे येतात, असे गडकरी म्हणाले.योग्य नियोजनाअभावी नद्यांचे बरेचसे पाणी वाहून समुद्राला मिळते; पूर येतो. योग्य पद्धतीने जलसंवर्धन केले, तर मोठ्या धरणांची गरजच नाही.



महाराष्ट्रात सिंचनाचे प्रमाण ६५ टक्क्यांवर गेल्यास व दूधदुभत्याची साथ मिळाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून आत्महत्या थांबतील, असे गडकरी म्हणाले, देशात पाण्याचेही राजकारण केले जाते, असे सांगतानाच जलशक्तीमंत्री असताना मी राज्याराज्यांतील २४पैकी १७ तंटे मिटवल्याचा दावा गडकरींनी केला.

# शिक्षक दिनाला मुस्लिम शिक्षकाला मंदिरात सत्कारासाठी का बोलावले?, त्याने गोंधळ घातला अन् करेक्ट कार्यक्रम

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील मानेगाव येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद आणि खाजगी हायस्कूलमध्ये शिक्षक असलेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. ५ सप्टेंबर रोजी मानेगाव येथील विठ्ठल मंदिरात विविध शिक्षकांचा सत्कार करण्यात आला होता. गावातील शिक्षक शौकत बाशु शेख यांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी ङ्कङ्कमुस्लीम आहेस, गोमांस खाणाऱ्याना मंदिरात कसे काय बोलावले?ङ्कङ्क, असा जाब विचारत गावातील परमेश्वर नागनाथ राऊत याने गोंधळ घातला. तसेच सोशल मीडियावर आक्षेपार्ह विधान केले. गावातील अल्पसंख्याक समाजातील इतर ग्रामस्थांनी एकत्रित येत याबाबत राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे तक्रार केली. राज्य अल्पसंख्याक आयोगाचे वसीम बुऱ्हाण यांनी ताबडतोब पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची भेट घेत तात्काळ कारवाई करण्यासंदर्भात पत्र दिले होते. पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार माढा पोलीस ठाण्यामध्ये संबंधित इसमा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शहाजान फतरु कोरबू यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, मानेगावामध्ये ३०० ते ४०० मुस्लिम समाजाचे नागरिक वास्तव्यास आहेत. मानेगाव येथील परमेश्वर नागनाथ राऊत हा नेहमी अल्पसंख्याक समाजातील नागरिकांना पाहुन हे लोक मटन खातात. तसेच त्यांना बोलत जाऊ नका असे म्हणून शिवीगाळ करत होता. मानेगाव येथील शिक्षक सुशील आंनद पारडे यांनी ५ सप्टेंबरला रात्री आठ वाजण्याच्या सुमारास गावातील विठ्ठल मंदीरामध्ये शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाकरिता गावातील सर्व शिक्षक तसेच अल्पसंख्याक समाजातील नागरिक कार्यक्रमाला हजर होते.या कार्यक्रमाला शौकत बाशु शेख या शिक्षकाला देखील बोलावले होते. त्यामुळे ते कार्यक्रमाला गेले होते. कार्यक्रम रात्री १० वाजण्याच्या सुमारास संपला. आयोजक आणि शौकत शेख हे बाहेर आले तेव्हा तेथे गावातील परमेश्वर नागनाथ राऊत हा आला. त्याने कार्यक्रम आयोजन करणाऱ्यांना ङ्कङ्कमुस्लिम शिक्षक आणि मुस्लिम समाजाचे लोक गोमांस खाऊन विठ्ठल मंदीरात आले. त्यामुळे देवस्थानाची विटंबना झाली. मुस्लिम शिक्षकांना आणि मुस्लिम लोकांना का बोलावले?ङ्कङ्क, असं म्हणत



गोंधळ घातला. त्यानंतर त्याने इन्स्टग्रामवर आक्षेपार्ह पोस्ट करत घाबरायचे नाही, असे विधान केले. त्याने जातीवादी आणि तेढ निर्माण करत अल्पसंख्याक समाजाच्या धार्मिक भावना दुखवणारे भडकाऊ पोस्ट मोबाईलवरुन प्रसारित केल्या आहेत.ही सर्व घटना राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य वसीम बुऱ्हाण यांच्याकडे लेखी स्वरूपात करण्यात आली होती. वसीम बुऱ्हाण यांनी सोलापूर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडे लेखी तक्रार केली. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिलेल्या आदेशानुसार माढा पोलीस ठाण्यामध्ये धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी परमेश्वर राऊत यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच राज्य अल्पसंख्याक आयोगाचे वसीम बुऱ्हाण यांनी महत्त्वाचं आवाहन केलं. अल्पसंख्याक समाजात येत असलेल्या शीख, ख्रिचन, मुस्लिम, जैन, बौद्ध यांना आवाहन केले आहे. कोणत्याही बाबतीत अन्याय होत असेल तर अल्पसंख्याक आयोग तात्काळ मदतीस येणार असे आश्वासन दिले आहे.

---

# पोटातलं बाळ रात्री जास्त लाथा मारतंय? डॉक्टरांनी सांगितलंय कारण!

आई होणं ही प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात सुंदर गोष्ट आहे. ह्या दरम्यान तिच्या शरीर आणि मनात अनेक बदल होत असतात. तिची आंतरिक शक्ती वाढीला लागते. चौथ्या महिन्यापासून तिला पोटात हालचाल जाणवू लागते. गरोदरपणात पोटातल्या गर्भाच्या हालचाली आणि मारलेल्या लाथा यांद्वारे आई बाळाच्या तब्येतीचा योग्य अंदाज लावत असते. आणि जसजसे दिवस पुढे जातात तसतशा बाळाच्या हालचाली वेगात सुरू होतात. सातव्या महिन्यात तर बाळ उलटसुलट फिरु लागते. मात्र अनेक गर्भवती स्त्रियांचं म्हणणं असतं की दिवसभरापेक्षा रात्रीच्या वेळी बाळ जास्त प्रमाणात ॲक्टिव्ह असतं. डॉ .अबिनया या स्त्रीरोगतज्ज्ञांकडून जाणून घेऊ या की नेमकं काय कारण आहे.



**सातव्या महिन्यानंतर सगळ्या हालचाली**

आई होणे हा स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात खास क्षण असतो. गरोदरपणाच्या चौथ्या महिन्यापासून, आईला गर्भाशयातील बाळाची थोडीशी हालचाल जाणवते आणि गर्भधारणेचे आठवडे जसजसे वाढत जातात तसतसे बाळाची हालचाल वाढते. सातव्या महिन्यानंतर, बाळाला हालचाल आणि लाथ मारणे जाणवू लागते. बाळाच्या या हालचालींवरून, आईला गर्भाशयातील बाळाच्या आरोग्याचा अंदाज येऊ शकतो.

**दर तासाला १० हालचाली**

आरोग्य तज्ञ म्हणतात की बाळाच्या दर तासाला १० हालचाली जाणवतात, परंतु काही महिला म्हणतात की त्यांना दिवसा हे कमी जाणवते, तर बाळ रात्री जास्त सक्रिय असते. तर येथे जाणून घ्या गर्भधारणेदरम्यान बाळ रात्री जास्त सक्रिय का असते. गर्भाशयातील बाळाच्या हालचाली दिवसभर दिसून येतात. तथापि, बहुतेक गर्भवती महिलांना रात्री बाळाच्या हालचाली जास्त जाणवतात. रात्री बाळाला कोणतीही हालचाल जाणवत नसल्यामुळे ते अधिक सतर्क होते.

गर्भवती महिला दिवसा जास्त सक्रिय असतात, ज्यामुळे बाळ झोपेच्या स्थितीत जाऊ शकते.

**रात्री हालचाल का जास्त**

रात्री बाळाच्या हालचाली जाणवण्याचे अनेक कारणांपैकी एक कारण म्हणजे तुम्ही दिवसा व्यग्र असता. अशा परिस्थितीत, जेव्हा तुम्ही रात्री शांत असता तेव्हा तुम्हाला लाथा जास्त जाणवतात. काही लोकांचा असा विश्वास आहे की झोपताना बाळाला जास्त रक्त मिळते, ज्यामुळे तो अधिक सक्रिय होतो.

**जेवणानंतर प्रतिसाद**

जेवणानंतर तुम्हाला आराम वाटतो. खाल्ल्याने तुम्हाला ऊर्जा मिळते आणि तुम्ही खाल्ल्यानंतर तुमचे बाळ लाथ मारून प्रतिसाद देऊ शकते. बाळाच्या गर्भाशयातही झोपेची पद्धत विकसित होते. तुमचे बाळ दिवसा झोपू शकते आणि तुम्हाला कोणतीही हालचाल जाणवत नाही. तथापि, जेव्हा बाळ जागे असते तेव्हा ते खूप हालचाल करते.

**प्रत्येक बाळ वेगळं**

प्रत्येक मुलाची हालचाल आणि वर्तन वेगवेगळे असते. काही मुले दिवसा खूप सक्रिय असू शकतात, तर काही रात्री जास्त सक्रिय असू शकतात. तुमची झोप, बसणे आणि तुमच्या हालचालींचा देखील मुलाच्या हालचालींवर परिणाम होतो.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना सीएससी केंद्रातून मिळणार माफक दरात सेवा

**जनसंचलन/बुलढाणा**

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना आता सीएससी(कॉमन सर्विस सेंटर) केंद्रामधून महामंडळाच्या योजनांचा लाभ माफक दरात घेता येणार आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे लाभार्थी आता त्यांच्या जवळच्या कोणत्याही सीएससी केंद्रावर जावून महामंडळाच्या योजनांचा लाभ कमी दरात घेऊ शकतील. यामध्ये महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे, योजनांची सद्यस्थिती तपासणे आणि आवश्यक मार्गदशन मिळविणे यासारख्या सुविधांचा समावेश आहे. सीएससी केंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध सरकारी आणि खाजगी सेवा पुरविण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. महामंडळाने सीएससी केंद्रासमवेत केलेल्या करारामुळे महामंडळाच्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाचेल. या करारामुळे उद्दिष्टे अधिक प्रभावीपणे पूर्ण होतील. राज्याच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गरजू आणि पात्र तरुणांपर्यंत महामंडळाच्या योजना पोहचणार आहेत. कमी खर्चात आणि त्यांच्या घराजवळच त्यांना आवश्यक सेवा मिळाल्यामुळे स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करुन मराठा समाजातील तरुणांना उद्योजक करण्याचा महामंडळाचा उद्देश पूर्णत्वास जेणे सोपे होईल. राज्यामध्ये सीएससीचे ७२ हजारापेक्षा जास्त केंद्र कार्यरत असल्याने त्यांच्या माध्यमातून अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या लाभार्थ्यांना त्यांच्या गावातूनच पात्रता प्रमाणपत्र कागदपत्र, बँकेचे कर्ज मंजूरी, बँकेचा हप्ता अपलोड करण्यासाठी प्रत्येकी ७० रुपये शुल्क आकारण्यात येणार असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी दिली. या करारामुळे लाभार्थ्यांचा वेळ वाचणार आहे, आणि त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही. ग्रामीण भागातील उद्योजकतेचा चालना मिळेल. यामुळे सद्यस्थितीत महामंडळाच्या नावाखाली लाभार्थ्यांकडून पैसे उकळणाऱ्या अनधिकृत एजंट लोकांना आळा घालणे शक्य होईल. भविष्यात लाभार्थ्यांसाठी महामंडळाचे मोबाईल ॲप व चॅट बॉट सुविधा सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या




नवीन उपक्रमामुळे महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक आणि किफायतशिर होईल, असे मत महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी व्यक्त केले.

# बियाणे, औषधे व खतांसाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत अन्नधान्य पिके व राष्ट्रीय खाद्य तेल अभियान गळीतधान्य पिके सन २०२५-२६ अंतर्गत रब्बी हंगामामध्ये पीक प्रात्याक्षिके तसेच प्रमाणित बियाणे वितरण या बाबीचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी चालू वर्षी हरभरा, ज्वारी, मका, तीळ, करडई, भूईमुंग व मोहरी या पिकांचे महाडीबीटी प्रणालीव्दारे बियाणे या घटकासाठी अर्ज स्वीकारण्यात येणार आहे. पीक प्रात्याक्षिके ही बाब शेतकरी गटामार्फत राबविली जाणार आहे. पीक प्रात्याक्षिकासाठी एका शेतकऱ्याला एक एकर मर्यादित निविष्ठा स्वरुपात अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार आहे. प्रमाणित बियाणे वितरणासाठी एका शेतकऱ्याला आवश्यक असणाऱ्या बियाण्याचा दोन हेक्टर मर्यादित लाभ देय असणार आहे. प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य या पध्दतीने लॉटरी करण्यात येणार आहे. या निविष्ठांचा पुरवठा करण्यासाठी लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या अर्जातून ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर बियाणे, औषधे व खते या बाबीअंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येईल. यासाठी जास्तीत-जास्त शेतकरी बांधवांनी या संकेतस्थळावर जावून ऑनलाईन अर्ज करावेत व या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# महिलांसाठी स्वस्थ नारी-सशक्त परिवार विशेष आरोग्य तपासणी मोहीम

**जनसंचलन/बुलढाणा**

ङ्गस्वस्थ नारी-सशक्त परिवारफ्र या अभियानाच्या माध्यमातून महिलांच्या आरोग्याविषयी जागरुकता वाढून संपूर्ण कुटुंब निरोगी राहण्यास मदत होणार आहे. त्या निमित्त आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत दि. १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान ङ्गस्वस्थ नारी-सशक्त परिवारफ्र या विशेष अभियानांतर्गत जिल्ह्यातील महिलांसाठी आरोग्य तपासणी, उपचार व समुपदेशन मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहीमेत महिलांमध्ये एनीमिया, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग तपासणी तसेच सामान्य आरोग्य समस्यांसाठी तपासणी केली जाणार आहे. याशिवाय किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य जनजागृती, गर्भवती महिलांची तपासणी व आवश्यक तेथे उपचाराची तात्काळ सोय करता येणार आहे. या कालावधीत जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये तपासणी शिबिर आयोजि करण्यात येतील. यामध्ये विशेषज्ञ डॉक्टरांकडून महिलांची तपासणी, समुपदेशन




व उपचार केले जाणार आहेत. या विशेष मोहिमेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील सर्व महिलांनी पुढाकार घेवून आरोग्य तपासणी करुन घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी केले आहे.

# रेशीम विभाग आपल्या दारी अभियानांतर्गत २ लाख १२ हजाराची मिळेल मजुरी

**जनसंचलन/बुलढाणा**



जिल्हा रेशीम कार्यालयाकडून रेशीम विभाग आपल्या दारी या मोहिमेला सोमवारी प्रारंभ झाला. योजनेत मनरेगा अंतर्गत एक एकर वृक्ष लागवड जोपासना करण्यासाठी २ लाख १२ हजार ७८४ मजुरी तीन वर्षात दिली जाणार आहे. जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत रेशीम विकास योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापूर्वी रेशीम योजना राबविण्यासाठी कार्यालयाकडे ५०० रुपये प्रती एकर प्रमाणे नोंदणी केली होती. मात्र, काही कारणास्तव तुती लागवड केली नाही व रेशीम उद्योग सुरु केला नाही. त्यांना त्यांच्या घरी जावून रेशीम योजनेची माहितीपत्रक व पुन्हा रेशीम उद्योग सुरु करण्याबाबत आवाहन करण्यात येणार आहे. तसेच त्यांनी तुती लागवड त्यावेळी का केली नाही याबाबत अभिप्राय घेण्यात येणार आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी केले जाते. एका गावातून कमीत कमी ५ शेतकऱ्यांनी ग्रामसभेच्या संमतीने जिल्हा रेशीम कार्यालयाकडे ग्राम रोजगार सेवक यांच्या मार्फत अर्ज करावेत. त्यासाठी प्रती एकर रुपये ५०० नोंदणी शुल्क रेशीम कार्यालयात जमा करावे. मनरेगा अंतर्गत एक एकर वृक्ष लागवड जोपासना करण्यासाठी २ लक्ष १२ हजार ७८४ मजुरी तीन वर्षात दिली जाणार आहे. रेशीम किटक संगोपन गृह बांधकामासाठी मजुरी ६६ हजार ४५६ रुपये तर साहित्यासाठी १ लाख ५३ हजार दिले जाणार आहेत. असे एकूण ४ लाख ३२ हजार २४० तीन वर्षात दिले जाणार आहेत. बहुभूधारक शेतकऱ्यांसाठी केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-२ या योजनेत सहभाग घेता येईल. तुती वृक्ष लागवडीसाठी १ एकरसाठी ४५ हजार, सिंचन व्यवस्थेसाठी ४५ हजार संगोपनगृह बांधकामासाठी २ लक्ष ४३ हजार ७५०, संगोपन साहित्यासाठी ३७ हजार ५० आणि निर्जंतुकीकरण औषधीसाठी ३ हजार ७५० काम पूर्ण झाल्यावर देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी पर्यात्मक तुती शेतीशी निगडीत रेशीम उद्योग करुन रेशीम कोष निर्मिती करण्याचे आवाहन जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी या पावसाळ्यात १० कोटी वृक्ष लागवड पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी उद्दिष्ट दिले आहे. त्यामध्ये या तुती वृक्ष लागवडीची गणना होणार आहे. रेशीम संचालनालयास ४ कोटीचा लक्षांक देण्यात आला आहे. त्यापैकी २० लक्ष (३५० एकर) तुती वृक्ष लागवडीचके उद्दिष्ट बुलढाणा जिल्ह्यास देण्यात आले आहे.

## जातनिहाय जनगणना हाच उपाय!

## ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे शेगावात एकदिवस चिंतन शिबीर !

जनसंचलन/ शेगाव

राज्यात आरक्षणावरून जाणीवपूर्वक गोंधळ निर्माण करण्यात येत आहे. ओबीसी विरुद्ध ओबीसी असा लढा उभारण्यात येत आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी आपली आरक्षणावरील भूमिका जाहीर व स्पष्ट करावी. तसेच यावर जातनिहाय जनगणना हाच उपाय असल्याचे प्रतिपादन संस्थापक अध्यक्ष सुनील शेळके यांनी केले. ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन व एक दिवसीय चिंतन शिबीर रविवारी १४ सप्टेंबर रोजी येथील हॉटेल विघ्नकर्ता इन मध्ये पार पडले. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून युनिटी ऑफ मुलनिवासी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष व ओबीसी अभ्यासक कमलकांत काळे, जीएसटी विभागाचे माजी सहायक आयुक्त आणि एससी, एसटी, ओबीसी कर्मचारी वेल्फेअर फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय थुल, अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष तथा संघटनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष किशोर पवार यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना सुनील शेळके यांनी २०१८ मध्ये स्थापन झालेल्या संघटनेच्या आजवरच्या कामागिरीचा धावता आढावा घेतला. ते म्हणाले, संघटनेने ओबीसीमधील मरगळ दूर केली. काही लघु तर काही दीर्घकालिक ध्येय निश्चित केली. त्यादृष्टीने मार्गक्रमण केले. चळवळीचे काम काम करताना



संघटनेने आधुनिक तंत्रज्ञानासोबत जुळवून घेतले. २४ तास लढणारी संघटना अशी ओळख निर्माण केली. ओबीसी बांधवांनी आपला खरा शत्रू कोण, मित्र कोण हे ओळखणे काळाची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. संघटना जातनिहाय जनगणनेसाठी आग्रही आहे. यावर जन जागृतीसाठी संघटना वर्षभर राज्यात जातगणना परिषद आयोजित करण्याची घोषणा शेळके यांनी केली

## हत्ता येथे हल्ला करणाऱ्या मुख्य आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या!

जनसंचलन/ लोणार

हत्ता या गावात एकाने पत्रकारासह त्यांच्या पत्नीवर हल्ला केला होता.याप्रकरणी मुख्य आरोपीला पोलिसांनी गजाआड केले आहे. लोणार तालुक्यातील हत्ता गावामध्ये १० जून २०२५ रोजी रात्री दरम्यान तुफान वाद झाला होता. एका पत्रकारासह त्यांच्या पत्नीवर अमानुष हल्ला करण्यात आला होता. या घटनेने संपूर्ण गावात खळबळ उडाली होती. पीडित कुटूंबांनी जवळच्या लोणार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती.पोलिसांनी सदर आरोपी शरद रामभाऊ पवार, विकास किसन पवार, दिलीप गोविंद पवार, संदीप गोविंद पवार, विजय किसन पवार, गोविंद हरी पवार यांच्यावर लोणार पोलीस ठाण्यात संबंधित ६ जणांविरोधात भा.दं.वि. कलम १८९(२), १९०, १९१(२), १९१(३), ११८(१), ११८(२). ११५ (२), ३२६, ३५१(२) व ३५२अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरच्या गुन्ह्यांचे तपास अधिकारी बिट जमादार सुधाकर गवाई यांच्या मार्गदर्शनांखाली सुरु होता. आरोपींनी वकीलांच्या मदतीने जिल्हा सत्र न्यायालय मेहकर येथे जमीन मिळण्यासाठी जमीन अर्ज सादर केला असता जिल्हा सत्र न्यायालयाने दोन वेळा जमीन फेटाळला. नंतर आरोपी यांनी पुन्हा आपल्या वकीलांच्या मदतीने उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथे सुद्धा जमीन अर्ज दाखल केला होता तर उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी सुद्धा जमीन फेटाळला असून अखेर आज आरोपीची माहिती मिळताच लोणार पोलिसांनी मुख्य आरोपी विकास किसन पवार याला ताब्यात घेतले. तीन महिन्यापासून फरार असलेला आरोपी अखेर लोणार पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपीला ताब्यात घेऊन आरोपीला बेड्या ठोकल्या आहे. सदर आरोपीला दिवाणी न्यायालय लोणार समोर हजर केले असता दिवाणी न्यायालयाने ४ दिवसाची पोलीस कोठडी दिली असून आरोपीला बुलढाणा येथील कारागृह येथे नेण्यास सांगण्यात आले आहे. सदरचा तपास हा लोणार पोलीस स्टेशनचे (पी.आय) मेहत्रे, बिट जमादार सुधाकर गवाई, पो. गजानन दराडे, पो. प्रदीप पवार, पो. सरकटे यांच्या दमदार कामगिरीच्या माध्यमातून आज पीडित कुटुंबांला न्याय मिळाल्याचे चित्र दिसत आहे.

## विद्यार्थ्यांना मिळाला पत्रकारितेचा पाठ!

## पत्रकार राजेंद्र काळे,जितेंद्र कायस्थ,रणजीत राजपूत यांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन!



जनसंचलन/बुलडाणा

समाजाचे प्रतिबिंब लेखणीतून उमटविणाऱ्या पत्रकारांनी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात १३ सप्टेंबरला शिवधारा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. प्रमोद कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, दलित मित्र पंढरीनाथ पाटील, रा.दे.भोंडे सरकार, अ.आ. बाहेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. व्यासपीठावर प्राचार्य कावरे, पर्यवेक्षक गजेंद्र राजपूत, शिक्षक व मान्यवर पत्रकार उपस्थित होते. या मार्गदर्शन शिबिरात प्रमुख मार्गदर्शक पत्रकार रणजितसिंग राजपूत, राजेंद्र काळे, जितेंद्र कायस्थ ॲड. मृणालताई सावळे उपस्थित होत्या. पत्रकारांनी विद्यार्थ्यांना पत्रकारितेचे महत्त्व, समाजातील माध्यमांची भूमिका, सत्य माहितीची जबाबदारी व विद्यार्थ्यांनी घडवायची जबाबदार नागरिकता या विषयांवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले व आपले विचार मांडले.



कार्यक्रमाचे संचालन नितीन ढोमणे यांनी केले, तर प्रास्ताविक मनोज चव्हाण यांनी केले. अध्यक्षीय भाषण पंढरी वाघ यांनी केले. आभार प्रदर्शन सौ. हिंगे मॅडम यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व कु. देशमुख हिने केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पर्यवेक्षक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उत्कृष्ट खेळाडू, माजी सैनिक, पत्नी, पाल्यांना मिळणार विशेष गौरव पुरस्कार

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळातील पुरस्कार प्राप्त खेळाडू, साहित्य, संगीत, गायन, वादन, नृत्य इत्यादी क्षेत्रातील पुरस्कार विजेते, यशस्वी उद्योजकांचा पुरस्कार मिळविणारे, संगणक क्षेत्रात अतिउत्कृष्ट कामगिरी करणारे, पुर, जळीत, दरोडा अपघात व इतर नैसर्गिक अपत्तीमध्ये बहुमोल कामगिरी करणारे तसेच देश, राज्याची प्रतिष्ठा वाढवतील अशा स्वरुपाचे लक्षणीय काम करणारे माजी सैनिक, पत्नी, पाल्य यांना अशा कार्याबद्दल त्यांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय स्तरासाठी २५ हजार रुपये व आंतरराष्ट्रीय स्तरासाठी ५० हजार रुपयांचा विशेष गौरव पुरस्कार सैनिक कल्याण विभागाकडून दिला जातो. तसेच १० वी व १२ वी बोर्डाच्या



परीक्षेत ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या शैक्षणिक बोर्डातून फक्त १० माजी सैनिक पाल्यांना २० हजार रुपयाचा विशेष गौरव पुरस्कार सैनिक कल्याण विभागाकडून दिला जातो. वरील निकष पात्र माजी सैनिक, पत्नी, पाल्य यांनी सर्व आवश्यक कागदपत्रे गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे जमा करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, बुलढाणा यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८